गोवा सरकार
माहिती आणि प्रसिध्दी खात
पणजी-गोवा
वार्तापत्र

## गोवा मजूर कल्याण मंडळाच्या विविध योजना

ता. 19 जून 2019
29 ज्येष्ठ 1941

गोवा मजूर कल्याण मंडळाने औद्योगिक कामगारांच्या फायद्यासाठी आणि त्यांच्या मुलांचे भविष्य घडविण्यास मदत करण्यासाठी एकूण 19 योजना यावर्षी सुरू केल्या आहेत. कामगारांच्या शाळेत जाणा-या मुलांसाठी वहया, पुस्तके, गणवेष खरेदी करण्यासाठी आर्थिक साहाय्य, शाळा आणि महाविद्यालयात शिकणा-या मुलांसाठी शिष्यवृत्ती, मुलींसाठी शाळा महाविद्यालयाच्या हजेरीनुसार 5 वी वर्गापासून पुढील कोणत्याही शिक्षणापर्यंत आर्थिक मदत, दहावीपासून मंडळाच्या किंवा विद्यापिठाच्या अंतिम परीक्षेत घेतलेल्या गुणांच्या आधारे कामगारांच्या मुलांना आर्थिक मदत, क्षयरोग उपचारासाठी मदत देतात. या शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख 30 सप्टेंबर अशी आहे.

औद्योगिक आस्थापन, मजूर कामगार केंद्रे, क्लब, रिक्रियेशन रूम यांना टीव्ही संच पुरविण्यासाठी योजना, औद्योगिक कामगारांना चष्मे खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत, महिला औद्योगिक कामगारासाठी बाल निगा लाभ योजना, स्त्री सखी योजनेखाली सॅनिटरी नॅपकीन पुरवठा योजना, क्रीडा आणि सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनासाठी मदत, सहली व दौ-यासाठी आर्थिक मदत योजना, पाळणाघर सुविधेसाठी योजना, मनोरूग्ण मुलांच्या उपचारासाठी मदत, वाचनालय आणि इतर सुविधांसाठी मदत देणा-या योजना मंडळातर्फे राबविण्यात येत आहेत.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी कामगारांनी आपल्या मालकामार्फत सचिव, गोवा मजूर कल्याण मंडळ, श्रमशक्ती भवन, 4 था मजला, पाटो-पणजी येथे अर्ज करावे.

मा/वाप/एनजी/जॉआ/रना/सुसुका/2019/343